!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७६ ०९-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# पाकिस्तानशी मैत्री नको जशास तसे उत्तर द्या :

## शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत मागणी

नवी दिल्ली (ता. १६) : पाकिस्तानशी मैत्री कसली करता त्यांना सडेतोड उत्तर द्या शिवसेनाप्रमुखांनीही वेळोवेळी सरकारला बजावले होते आज ही शिवसेना त्यावर ठाम आहे असे ठणकावत सरकारला बजावले होते. आज ही शिवसेना त्यावर ठाम आहे असे ठणकावत इसिसचे जाळे मराठवाड्यापर्यंत पोहचली आहेत हा धोका लक्षात घ्या आणि घातपातच्या कारवाया होणार नाहीत यासाठी कडक उपाययोजना गृहमंत्र्यांच कराव्यात अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत आज झालेल्या १९३ नियमाअंतर्गत झालेल्या पठाणकोट हल्यांच्या चर्चेदरम्यान केली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पाकिस्तानशी संबंध ठेवू नका, चर्चा, मैत्री करु नका असे वेळोवेळी ठणकावले होते. ज्याज्या वेळी हिंदुस्थानने पाकिस्थानशी चर्चा केली त्यावेळी हिंदुस्थानात घातपात कारवाया आतंकवादी हमले झाल्याचा इतिहास विसरता येणार नाही. याची आठवण ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी सभागृहाला करुन दिली. तशकंद करारानंतर तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांचे निधन झाले. तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी यांनी ही ऐतिहासिक लाहोर यात्रा केली त्यानंतर कारगील युध्दाला आपल्या सामोरे जावे लागले. तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी ही पाकिस्थान यात्रा केली त्यानंतर मुंबईत २००निर्दोष लोकांना प्राण गमवावे लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ डिसेंबर २०१५ ला पाकिस्थानात भेट दिली आणि आठवड्या भरातच २ जानेवारीला पठाणकोट एअरबेस हल्ला झाला. यात ७ भारतीय सैनिकांना शहिदत्व व एका नागरिकाला प्राण गमवावे लागले. पाकिस्थानात मैत्रीच्या लायकीचा नाही हे तेराव्या लोकसभेत मी मांडले होते शिवसेनाप्रमुखांनी ही वेळोवेळी ठणकावूनही असे प्रयत्न होतात व त्यांचा परिणाम निर्दोष जनतेला भोगावा लागत असल्याचे शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत स्पष्ट केले. सामना सारखे दैनिक, उध्दवजी ठाकरे यांच्यासह व इतर वृत्तपत्र ही या गोष्टी वेळोवेळी सांगत असतात की पाकिस्तान सारख्या बिनभरवशाच्या देशाला जशाच तसे उत्तर देण्याची गरज असल्याचे ही त्यांनी अधोरेखित करत ही शिवसेनेची ठाम भुमिका असल्याचे सांगितले.

### संवेदनशिल संभाजीनगरात कडक पाळत ठेवा

इसिसचा एक सक्रिय कार्यकर्ता वैजापुरातुन पकडण्यात आल्याने हि धोक्याची घंटा वेळीच लक्षात घेऊन संरक्षणमंत्री व गृहमंत्री यांनी कडक उपाययोजना करण्याची गरज असल्याची मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली. पुर्व हिंदूस्थानात झालेल्या आतंकवादी कारवाया, मुंबईत झालेल्या बॉंबस्फोट, पुण्यातील जर्मन बेकरी येथील स्फोट, हैद्राबाद येथील बॉंब स्फोट या सर्वांचे धागे संभाजीनगरशी जुळलेले नेहमीच आढळून सिध्द झाले आहे. या करिता संवेदनशिल असलेल्या संभाजीनगर शहरात इसिस, सिमी, इंडियन मुजाहीदीन यांच्या झुप्या कारवाया व घातपातच्या शक्यता लक्षात घेऊन कडक पाळत ठेऊन अशा कारवायामध्ये संशयीतांना कठोर शासन करावे अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली.

पठाणकोट हल्ल्याची स्थानिक पोलिस यंत्रणेला माहिती असतांना सैन्य दलाला का तैणात केले गेले नसल्याचे प्रश्न उपस्थित करत पोलिस अधिक्षक सविंदर सिंग यांच्या लापरवाहीमुळे पंजाब मधील बाशियाल भागातुन अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्याऐवजी आतंकवादी देशात दाखल झाले. या भागाचा नेहमीच घुसखोरीसाठी उपयोग केला जातो. २७ जुलै २०१५ गुरुदासपुरच्या दिनानगर पोलिस ठाण्यावर ही हल्ला केल्या आतंकवादी याच रस्त्याने देशात दाखल झाले होते. पोलीस अधिक्षक पदावरील सविंदर सिंग सारख्या बेजबाबदार अधिकाऱ्यांनबद्दल तेथील राज्य सरकार गंभीर का नाही असा सवाल ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत उपस्थित करत मिळालेल्या दस्ताऐवजावरुन या हमला जैश ए मोहम्मद ने केलेल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी ही योग्य त्या उपाय योजना केंद्र शासनाने कराव्यात अशी मागणी ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525